# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१४ – १५

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

खेड टाइम्स — विकसित पत्रकारितेचा नवा आदर्श | २ | १२ ते १८ डिसेंबर २०१४

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे खरपुडी खुर्द येथे हिवाळी शिबिर

राजगुरुनगर, (प्रतिनिधी) - राष्ट्रीय सेवायोजनेची शिबिरे हे विद्यार्थ्यांचे जीवन घडविणारी संस्कार केंद्रे आहेत, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी खरपुडी खुर्द येथे केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक शिबिरास खरपुडी खुर्द येथे झाले.शिबिराचे उद्घाटन ॲड. देवेंद्र बुट्टे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खरपुडीचे सरपंच उमेश गाडे हे होते. यावेळी खेड बाजार समितीचे माजी उपसभापती दशरथ गाडे, साई शिंदे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डी. बी. सुकाळे यांच्यासह खरपुडी गावातील ग्रामस्थ, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या झांज पथकाचे उद्घाटन ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी बनविलेल्या 'पोस्टर'चे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. प्रास्ताविक प्रा. दिलीप मुळूक यांनी केले. प्रा. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आभार मानले.



खरपुडी खुर्द : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील



खरपुडी खुर्द येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

# विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**दावडी :** खरपुडी खुर्द (ता. खेड) येथे जागतिक एड्स दिनानिमित्त एच. आय. व्ही.संदर्भात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. अशा प्रकारचा उपक्रम राबविणारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग पहिला असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे पुणे विद्यापीठाचे ग्रामीण समन्वयक डॉ. फुलसुंदर यांनी केली. ते या शिबिरास सदिच्छा भेट देताना बोलत होते.

खरपुडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सातदिवसीय शिबिर सुरु आहे. या शिबिरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

आज शिबिरातील ५४ विद्यार्थ्यांची एसडी बायो लाईन एच.आय.व्ही. आरोग्य तपासणी करण्यात आली. कॅस पुणे ग्रामीण विभागाअंतर्गत एच. एस. शेख, एम. एस. पडवळ यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. भूषण सांडभोर, करण मोहिते, संतोष कोळेकर, श्रीपाद जाधव, काजल बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांमध्ये खुली चर्चा व संवाद घडवून आणला. या उपक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. धनंजय वाघ, प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले. (वार्ताहर)

लोकमत पुणे, रविवार, दि. ७ डिसेंबर २०१४ ८

राजेंद्र मांजरे



खरपुडी खुर्द (ता. खेड) येथे हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचे विद्यार्थी श्रमदान करताना.

# खरपुडी खुर्दला रासेयोचे श्रमसंस्कार शिबिर

दावडी : खरपुडी खुर्द (ता. खेड) येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात १३८ विद्यार्थी विद्यार्थिनींचा सहभाग असून, सात दिवस चालणाऱ्या या शिबिरात विविध व्याख्याने, श्रमदान व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पहिल्या दिवशी (दि. ४) खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी या शिबिराचे उद्घाटन केले. याप्रसंगी खरपुडीचे सरपंच उमेश गाडे, दशरथ गाडे, साई शिंदे, प्राचार्य एस. बी. पाटील, उपप्राचार्य बी. डी. सुकाळे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, राष्ट्रीय सेवा योजनेच्या झांज पथकाचे उद्घाटन झाले. स्वयंसेवकांनी तयार केलेल्या स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या पोस्टरचे प्रदर्शन मांडण्यात आले.

आज विद्यार्थ्यांनी श्रमदान करताना गावातील रस्ते, खंडोबा मंदिर परिसर, सार्वजनिक गटारे, प्राथमिक शाळा परिसराची स्वच्छता केली. सरपंच उमेश गाडे, संदीप गाडे, प्रकाश गाडे या ग्रामस्थांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा.दिलीप मुळूक, प्रा. स्मिता कोळेकर, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. धनंजय वाघ यांनी या शिबिराचे नियोजन केले आहे. (वार्ताहर)

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख